पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - २
सभावृत्तांत

दिनांक :- २५/०४/२०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - २५/०४/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. भारती फरांदे - सभापती
२. मा. मोटे किरण बाळासाहेब
३. मा. जवळकर वैशाली राहुल
४. मा. सौ. साळुंके सविता सुरेश
५. मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६. मा. आल्हाट मंदा उत्तम
७. मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
८. मा. काळे विमल रमेश

याशिवाय मा.टेकाळे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - उप नगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक ११/०१/२०१२, २२/०२/२०१२ व ०७/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १२ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १६/०४/२०१२ रोजी झालेल्या पहिल्या सभेचा ( विशेष सभेचा ) (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे सभापती यांनी प्रकट केले.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -

विषय क्रमांक :- १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील योजना क्रमांक ३ मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणेबाबत.

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - १
दिनांक - २५/०४/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा. किरण मोटे अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ - महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र. नावियो/११/कावि/१५५/२०१२
दिनांक - २३ / ०४ / २०१२

मा.महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

महापालिका हद्दीतील मुलींना योजना क्रमांक ३ अन्वये तांत्रिक प्रशिक्षणाकामी प्रत्येकी र.रु.२,०००/- इतके अर्थसहाय्य अदा केले जाते. वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन अर्जदाराकडून अर्ज मागविण्यात आले असून सन २०१० - २०११ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कासारवाडी व मोरवाडी यांचेकडील या कार्यालयात एकूण १०७ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ९६ अर्ज पात्र झाले असून ११ अर्ज अपात्र झालेले आहेत. ९६ पात्र अर्जदारांना प्रत्येकी र.रु.२,०००/- प्रमाणे अर्थसहाय्य देण्याकरिता र.रु.१,९२,०००/- अदा करणेस तसेच जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अपात्र ठरले आहेत त्यांना पुर्तते नंतर लाभ देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ ६४६ /२०१२
दिनांक :- २५/०४/२०१२

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.